मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा! : ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com | पुणे, पिंपरी-चिंचवड | शनिवार, दि. 5 ऑक्टोबर 2024 | पान- 1

# चिंचवडची जागा राष्ट्रवादीला मिळावी.. अन्यथा महाविकास आघाडीत प्रवेश करू..!

**माजी नगरसेवक, पदाधिकाऱ्यांकडून ठराव करत थेट अजित पवारांना इशारा : चिंचवड विधानसभेत अजित पवार गटाने तातडीने एक बैठक घेतली**



**पिंपरी | प्रतिनिधी**

चिंचवड विधानसभेत अजित पवार गटाने तातडीने एक बैठक घेतली आहे. ही जागा घड्याळाला मिळाली नाही तर आम्ही महाविकास आघाडीत प्रवेश करू, असा एकमताने ठराव माजी नगरसेवक पदाधिकाऱ्यांकडून करण्यात आला आहे.

पुनावळे येथील एका हॉटेलमध्ये आज (दि.०४) ही बैठक संपन्न झाली. यावेळी इच्छुक उमेदवार नाना काटे, मोरेश्वर भोंडवे आणि मयूर कलाटे हे देखील हजर होते. मोरेश्वर भोंडवे, मयूर कलाटे, प्रशांत शितोळे आणि विनोद नढे या माजी नगरसेवकांनी शरद पवारांची भेट आधीचं घेतली आहे. तसेच नाना काटे हे देखील प्रदेशाध्यक्ष जयंत पाटलांच्या संपर्कात असल्याची माहिती मिळत आहे. मात्र अजित पवारांना पुन्हा एकदा इशारा देण्यासाठी आजची बैठक आज घेण्यात आली होती.

चिंचवडची जागा राष्ट्रवादीला घ्या आणि उमेदवारी आमच्यातील एकाला द्या. अन्यथा आम्ही महाविकास आघाडीत अर्थात तुतारी फुंकू असा इशारा थेट अजित पवारांना यावेळी देण्यात आला आहे.

## महापालिकेच्या कर्मचाऱ्यांना दिवाळी बोनस

**महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी दिवाळी बोनसची घोषणा केली.**



**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिकेच्या आस्थापनेवरील साडेसहा हजार कर्मचारी आणि अधिकाऱ्यांना दिवाळीपूर्वीच मोठी खुशखबर दिली आहे. महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी दिवाळी बोनसची घोषणा केली. त्यानुसार किमान महिन्याच्या पगाराएवढा हा बोनस या महिन्याच्या पगाराअगोदर दिवाळीपूर्वीच त्यांना मिळणार आहे. महापालिका आयुक्तांसह वैद्यकीय विभागातील अधिकाऱ्यांना लाखांत बोनस मिळणार आहे.

राज्यातील मोजक्याच हातावर मोजता येतील इतक्याच महापालिका दरवर्षी बोनस देत आहेत. मुंबई ही सर्वात मोठी आणि केरळ राज्याएवढा अर्थसंकल्प असलेली महापालिका तो देत नाही. पुणे महापालिकेच्या अगोदर तो जाहीर करून पिंपरी-चिंचवड महापालिकेने यावर्षी आघाडी घेतली. यावर्षी सेवानिवृत्त झालेले, राजीनामा दिलेले, व्हीआरएस घेतलेले तसेच निलंबित कर्मचारी आणि अधिकाऱ्यांनाही बोनस मिळणार आहे. फक्त सहा महिन्यांपेक्षा कमी सेवा झालेले नवीन कर्मचारी आणि अधिकारी यापासून वंचित राहणार आहेत. तर मानधनावरील अधिकारी, कर्मचारी यांना वीस हजार रुपये दिले जाणार आहेत.

आयुक्त शेखर सिंह यांनी साडेआठ टक्के सानुग्रह अनुदानाशिवाय वीस हजार जादा बोनस म्हणून मिळणार आहे. त्यानुसार चतुर्थ श्रेणीतील कर्मचाऱ्यांना किमान चाळीस हजार, प्रथम श्रेणीतील अधिकाऱ्याला अडीच लाख बोनस मिळणार आहे. अनेक अधिकारी त्यातून लखपती होणार आहेत. महापालिका आयुक्तांना तो किमान दोन लाख मिळेल., त्यांच्यापेक्षाही जास्त महापालिका रुग्णालयातील काही ज्येष्ठ डॉक्टरांना जास्त म्हणजे अडीच लाख रुपयांपर्यंत मिळेल, असे महापालिकेच्या लेखा विभागातून सांगण्यात आले.

## महापालिकेच्या पहिल्या इंग्रजी माध्यमिक शाळेचे आयुक्त शेखर सिंह यांच्या हस्ते उद्घाटन

**महापालिका शाळांमधील 8 वी ते 10 वी च्या विद्यार्थ्यांना उपलब्ध होणार इंग्रजी माध्यमाचे शिक्षण**



**पिंपरी | प्रतिनिधी**

आज आपण शिक्षणाच्या एका नवीन युगाच्या उंबरठ्यावर उभे आहोत, जिथे ज्ञानाची सीमा नाही आणि प्रत्येक विद्यार्थ्याला हे ज्ञान आत्मसात करण्याची संधी आहे. महापालिकेच्या वतीने फुगेवाडी येथे उभारण्यात आलेली ही माध्यमिक इंग्रजी शाळा केवळ एक इमारत नसून विद्यार्थ्यांसाठी एक आशेचा किरण आहे. महापालिका शाळांमध्ये एक सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी, येथील विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना आणखी बळ देण्यासाठी आणि त्यांच्या उज्वल भविष्यासाठी केलेली ही गुंतवणूक आहे. भविष्यात या शाळेतील विद्यार्थी नक्कीच शहराचे नाव राष्ट्रीय तसेच जागतिक पातळीवर उंचावतील, असा विश्वास आयुक्त शेखर सिंह यांनी व्यक्त केला.

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने फुगेवाडी येथील लोकमान्य बाळगंगाधर टिळक विद्यामंदिर शाळेच्या नवीन इमारतीमध्ये ८ वी ते १० वी मधील विद्यार्थ्यांसाठी इंग्रजी माध्यमाची शाळा उभारण्यात आली आहे. या शाळेचे उद्घाटन आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या हस्ते आज झाले, त्यावेळी ते बोलत होते.

या उद्घाटन समारंभास अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, सहाय्यक आयुक्त विजयकुमार थोरात, उमेश ढाकणे, प्रशासन अधिकारी संगीता बांगर, मुख्याध्यापक राहुल अडवानी, आयटीच संस्थेच्या संचालक नेहा वैद्य, सिनियर गव्हरमेंट पार्टनरशिप असोसिएट गितेश शिनगारे, शंकर शिर्के, महेंद्र भोर, बजाज ग्रुप सीएसआर अध्यक्ष कुरूष इराणी तसेच आयटीच संस्थेचे प्रतिनिधी आणि शाळेतील विद्यार्थी उपस्थित होते.

आयुक्त शेखर सिंह म्हणाले, महापालिकेच्या सध्या २ इंग्रजी माध्यमांच्या प्राथमिक शाळा कार्यरत आहे. या शाळा शिक्षण विभागामार्फत चालविण्यात येतात. माध्यमिक शाळांची तरतूद नसल्याने इयत्या नववी आणि दहावीच्या शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना खाजगी शाळांचा पर्याय शोधावा लागतो. यामध्ये विद्यार्थ्यां-ची गळती होण्याची शक्यता फार असते. तसेच महापालिका शाळेतील विद्यार्थ्यांना खाजगी शाळांच्या वातावरणात रुळायला व त्यांच्या शिक्षण पद्धती आत्मसात करण्यासाठी अनेक अडचणी येऊ शकतात. विद्यार्थ्यांना येणाऱ्या या समस्या दूर करण्यासाठी महापालिकेच्या वतीने सार्वजनिक - खाजगी भागीदारीतून ८ वी ते १० वी मधील विद्यार्थ्यांसाठी फुगेवाडी येथे माध्यमिक शाळा सुरू करण्यात आलेली आहे.

# बंदूक घेऊन पोस्टरबाजी करायची तर गृहमंत्र्यांनी बॉलिवूडमध्ये जावे : खासदार सुप्रिया सुळे

## गृहखात्यावर ताशेरे ओढत त्यांनी गृहमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी केली.

**पुणे | प्रतिनिधी**

पुण्यातील बापदेव घाटात परप्रांतीय युवतीवर सामूहिक बलात्काराच्या पार्श्वभूमीवर खासदार सुप्रिया सुळे यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी गृहखात्यावर ताशेरे ओढत त्यांनी गृहमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी केली. यावेळी सुप्रिया सुळे म्हणतात, राज्यात कायद्याचे राज्य जवळपास नाही आहे. यामुळे महिला सुरक्षेचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होतो आहे.

राज्यातील पोरी बाळींवर सामूहिक बलात्कार होत असेल तर गृहखाते सांभाळणारे गृहमंत्री काय करत आहेत? त्यांचा पोलिसखात्यावर पुरेसा धाक राहिला नाही का ? अशा घटनांनी पुण्याची असलेली सांस्कृतिक आणि शैक्षणिक ओळख पुसली जाऊन क्राइम कॅपिटल इतकीच ओळख उरेल. पुण्यात अलीकडे ड्रग्स, कोयता गँग, गँगरेप सारख्या घटना सर्रास घडत आहेत. मला गृहमंत्र्याना एक प्रश्न विचारावा वाटतो, पक्ष फोडायला त्यांची यंत्रणा चालते, महिलांवरील अत्याचार थांबवायला त्यांची यंत्रणा का चालत नाही?

गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हातात बंदूक घेऊन मतासाठी पोस्टर बाजी करणे, चुकीचे आहे. त्यांना असे करायचे असेल तर बॉलीवूड मध्ये जावे, गृहमंत्री म्हणून असे चालणार नाही. बारामती, इंदापूर, दौंड, पुरंदरमध्ये प्रत्येकी अशी एक घटना घडली आहे, याला सरकार जबाबदार आहे



### हर्षवर्धन पाटील आणि आमच्या कुटुंबियांचे जवळचे संबंध

» हर्षवर्धन पाटील यांनी आज राष्ट्रवादी शरद पवार गटात प्रवेश करत असल्याची अधिकृत घोषणा केली. यावर पत्रकारांनी विचारल्या असता सुळे म्हणाल्या, हर्षवर्धन पाटील आणि आमच्या कुटुंबियांचे जवळचे संबंध आहेत. आमच्यात यापूर्वी झालेले संघर्ष राजकीय होते. कधीही कटूता आलेली नाही, हर्षवर्धन पाटील आमच्याकडे आल्यावर तर म्हणाले आता मला चांगली झोप लागतेय. पवार साहेबांवर विश्वास ठेवून आलेल्या प्रत्येकाचा मानसन्मान होईल, संघर्षाच्या काळात आमच्या सोबत जे राहिले त्यांचा मानसन्मान होईल.

### हा महाराष्ट्र साठी काळा दिवस

» आमदार नरहरी झिरवळांनी आज आदिवासी आरक्षणाच्या प्रश्नावर मंत्रालयातून जाळीवर उडया मारल्या. यावर भाष्य करताना सुप्रिया सुळे म्हणतात, ' झिरवळ साहेब डेप्युटी स्पीकर आहेत. असे त्यांना वाटणे म्हणजे सरकार जाण्याची वेळ आलेली आहे. सत्तेतील आमदाराला पक्ष सोडण्याची वेळ येते म्हणजे सत्ता जाण्याची, सरकार जाण्याची वेळ आली आहे. झिरवळ साहेबांना मुख्यमंत्री यांना भेटायला वेळ घ्यावी लागते, ते उपसभापती पदावर आहेत. त्यांना वेळ मिळत नसल्याने जीवला धोका होईल अशी कृती करावी लागत आहे. सत्तेतील आमदाराने आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला, ही भयानक गोष्ट आहे.

# पीएमआरडीएकडून अनधिकृत बांधकामांवर गुन्हे दाखल!

## नोटीस पाठवूनही घेतली नाही दखल, दोन ठिकाणी नोंदवले गुन्हे

**पुणे | प्रतिनिधी**

जिल्ह्यातील वाढते अतिक्रमण प्रशासनाची डोकेदुखी ठरू लागली आहे. त्यामुळे आता कारवाईसोबतच गुन्हे दाखल करण्याची पावले उचलण्यात आली आहेत. पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून (पीएमआरडीए) नुकतेच या प्रकरणी दोन वेगवेगळ्या ठिकाणी गुन्हे दाखल केले आहेत. नोटीसकडे दुर्लक्ष केल्यामुळे शेवटी दोघांवर गुन्हे दाखल करण्याची कारवाई करण्यात आल्याची माहिती महानगर आयुक्त योगेश म्हसे यांनी दिली.

हिंजवडी आणि मांजरी भागातील अनधिकृत बांधकामधारकावर गुन्हे नोंदवण्यात आले आहे. तत्पूर्वी संबंधितांना अनधिकृत बांधकाम थांबवण्याबाबत नोटीस बजावली होती. पण त्याकडे दुर्लक्ष केले. त्यानुसार हिंजवडी येथील स.नं. २५८ या ठिकाणी श्रीकांत भानुदास नवले (रा. हिंजवडी ता. मुळशी) यांच्याविरोधात हिंजवडी पोलीस स्टेशन तर मांजरी येथील सर्व्हे नं.१५३ येथील अनधिकृत बांधकाम करणारे दीपाली विजय भाडाळे (रा. हडपसर,पुणे) यांच्याविरुध्द हडपसर ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ कलम ५४ (२) अन्वये ही कारवाई केली.




पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण हद्दीतील मालमत्ताधारकांनी परवानगी घेऊनच आपली बांधकामे करावीत, असे आवाहन करण्यात येत आहे. यासह सुरू असलेली अनधिकृत बांधकामे तत्काळ थांबवावीत. अन्यथा संबंधितांवर उक्त नियमाप्रमाणे कारवाई करणार असल्याचे पीएमआरडीएच्या अनधिकृत बांधकाम निर्मूलन विभागाच्या उपजिल्हाधिकारी डॉ. दीप्ती सूर्यवंशी-पाटील यांनी स्पष्ट केले. पोलीस अधीक्षक तथा दक्षता अधिकारी अमोल तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार सचिन मस्के, रवींद्र रांजणे, कनिष्ठ अभियंता गणेश जाधव, विष्णुदास आवाड यांनी कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केली.

# श्रीसूक्त पठणातून महिलांनी केली 'देवी शक्तीची' स्तुती

## तब्बल 5 हजार महिलांनी श्रीसूक्त आणि श्री गणपती अथर्वशीर्ष पठण, माता माता की जय... चा नामघोष

**पुणे | प्रतिनिधी**

ओम हिरण्यवर्णां हरिणीं सुवर्णरजतस्त्रजाम्, चंद्रा हिरण्मयीं लक्ष्मीं जातवेदो म आवह... च्या स्वरांनी श्री महालक्ष्मी मंदिराचा परिसर दुमदुमून गेला. तब्बल ५ हजार महिलांनी सामुहिकरित्या केलेल्या श्रीसूक्त आणि श्री गणपती अथर्वशीर्ष पठण, माता माता की जय... चा नामघोष आणि शंख वादनाच्या निनादाने नवरात्र उत्सवातील द्वितीयेची पहाट मंगलमय झाली.



निमित्त होते, श्री महालक्ष्मी मंदिर, श्री बन्सीलाल रामनाथ अग्रवाल धार्मिक व सांस्कृतिक ट्रस्ट च्यावतीने आयोजित सार्वजनिक नवरात्र उत्सवात झालेल्या सामुहिक श्री सूक्त पठण कार्यक्रमाचे. यावेळी मुख्य आयकर आयुक्त रिना झा-त्रिपाठी, डॉ.सतिश देसाई, ट्रस्टचे प्रमुख संस्थापक विश्वस्त राजकुमार अग्रवाल, प्रमुख विश्वस्त अमिता अग्रवाल, विश्वस्त अ‍ॅड. प्रताप परदेशी, भरत अग्रवाल, तृप्ती अग्रवाल, प्रवीण चोरबेले, हेमंत अर्नाळकर, निलेश लद्दड आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात ढोल-ताशा वादनाने झाली. केशव शंखनाद पथक आणि श्रीमंत केसरी शंखनाद पथकातील वादकांचे शंखवादन झाले. कार्यक्रमास पारंपरिक वेशात उपस्थित महिलांनी जय माता दी... च्या जयघोष करीत आसमंत दणाणून सोडला. श्रीसूक्त म्हणजे काय? त्याचे महत्व आणि महती याविषयी मीनल चौरसिया यांनी उपस्थितांना माहिती दिली. अथर्वशीर्षाचा एक पाठ आणि श्री सूक्ताचे तीन पाठ असे सामुदायिकरित्या पठण करण्यात आले. कार्यक्रमाची सांगता आरतीने झाली.

अमिता अग्रवाल म्हणाल्या, धार्मिकतेला सामाजिकतेची जोड देणारा समाजातील सर्व घटकांना सामावून घेणारा 'सार्वजनिक नवरात्र उत्सव' महालक्ष्मी मंदिरात दरवर्षीप्रमाणे यंदाही साजरा होत आहे. सामुहिक श्रीसूक्त पठणाच्या माध्यमातून महिला शक्तीने एकत्र येऊन स्त्री शक्तीचा जागर करावा, हा उद्देश दरवर्षी असतो. यंदा श्रीसूक्त पठणाच्या मोठया कार्यक्रमासह नारीशक्तीचा सन्मान सामुहिक गरबा आणि प्रतिकात्मक रावण दहन कार्यक्रम देखील होणार आहे. पुणेकरांनी या सर्व कार्यक्रमांमध्ये मोठया संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

# पुनावळे, ताथवडे, वाकडमधील रस्ते होणार सुसज्ज

## नागरिकांची वाहतूक कोंडीतून होणार मुक्तता : प्रभाग 25 मधील रस्त्यांच्या विकासकामांना महापालिकेकडून मंजुरी

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरामध्ये झपाट्याने होणाऱ्या विकासामुळे नागरिक शहरामध्ये वास्तव्यासाठी प्राधान्य देत आहेत. शहरामध्ये सुरू असलेले औद्योगिकीकरण व वाढत्या नागरीकरणामुळे शहरातील नागरिकांना मूलभूत पायाभूत सोयी-सुविधा देण्यात येत आहेत.

नागरिकांच्या राहणीमानाचा दर्जा उंचावण्यासाठी विविध विकास योजनांची अंमलबजावणी केली आहे. शहरातील प्रभाग २५ पुनावळे येथील वाढते उद्योग, नागरीकरणामुळे लोकसंख्येमध्ये वाढ झाली आहे. वाढत्या लोकसंख्येला दळणवळणासाठी सोयीस्कर रस्ते उपलब्ध व्हावेत, यासाठी शहरातील महत्त्वाच्या भागांना जोडणाऱ्या रस्त्यांची बांधणी व दुरुस्ती करण्याची विकास योजना महापालिकेने मंजूर केली आहे. यामुळे प्रभाग २५ मधील नागरिकांना मोठे दुहेरी मार्ग असणारे रस्ते उपलब्ध होणार आहेत, अशी मंजुरी महापालिकेच्या स्थायी समितीकडून देण्यात आली आहे.



**'हे' रस्ते होणार सुसज्ज आणि रुंद**

महानगरपालिकेच्या प्रभाग २५ पुनावळे, ताथवडे, वाकड या भागामध्ये येणाऱ्या रस्त्यांच्या विकास योजनांना महापालिकेकडून मंजुरी मिळाली आहे. यामध्ये मुंबई-बंगळुरू हायवेपासून काटेवस्तीकडे जाणारा ३०.०० मी. रुंदीचा व २००० मीटर लांबीचा डीपी रस्ता, कोयते वस्ती चौक ते जांभेगावाकडे जाणारा १८.०० मी. रुंदीचा व १३०० मीटर लांबीचा डीपी रस्ता, मधुबन हॉटेल ते इंदिरा रोड २४.०० मी. रुंदीचा व २५२० मीटर लांबीचा डीपी रस्ता, सिल्वर स्पून हॉटेल ते इंदिरा रोड १८.०० मी डीपी रस्ता त्यासोबतच मधुबन हॉटेल ते इंदिरा रोड व सिल्वर स्पून हॉटेल ते इंदिरा रोडपर्यंत जोडणारा वाकड शिवेपर्यंत १८.०० मी रुंदीच्या रस्त्याचे काँक्रीटीकरण करण्यात येणार आहे. याबरोबरच, ताथवडे गावातून जीवननगरतर्फे एमटीयू कंपनीकडे जाणारा १८.०० मी रुंदीचा व ८०० मीटर लांबीचा डी.पी रस्ता, बी.आर.टी रस्त्यापासून पुनावळे गावठाणातून जाणारा १८.०० मी रुंदीचा व ११९० मीटर लांबीचा डी.पी रस्ता, वाकड येथील टीपटॉप हॉटेलपासून अटलांटा २ सोसायटीकडे जाणारा १८.०० मीटर रुंदीचा व ८०० मीटर लांबीचा डी.पी रस्ता व गायकवाडनगरमधील १८.०० मी रुंदीचा व ७६० मीटर लांबीच्या डीपी रस्त्यांची उर्वरित स्थापत्यविषयक कामे करण्यात येणार आहेत.

### पुनावळे, ताथवडे, वाकड भागातील नागरिकांना दिलासा

**» प्रभाग २५ पुनावळे, ताथवडे, वाकड भागातील रस्त्यांच्या विकास योजनेमुळे प्रभागातील वाहतूककोंडी कमी होणार असून रहिवाशांची सोय होऊन प्रदूषण कमी होण्यास मदत होणार आहे. जसे की, वाकड भागातील भूमकर चौक व भुजबळ चौकामधील रस्त्याच्या बांधणीनंतर सध्या होणाऱ्या वाहतूक कोंडीस शहरवासीयांना सामोरे जावे लागणार नाही. सदर विविध रस्त्यांच्या विकास योजनांमुळे सुनियोजित पार्किंग व्यवस्था निर्माण होणार आहे. नागरिकांना आरामदायी प्रवास, दळणवळणासाठी सुसज्ज रस्ते, सुरक्षित पदपथ (पेडेस्ट्रीयन फ्रेंडली फुटपाथ) उपलब्ध होणार आहेत. सदर रस्त्यांच्या विकास योजनांमुळे पावसाळी पाण्याचा निचरा होण्यास मदत होणार आहे.**

> पिंपरी-चिंचवड शहरातील वाढत्या नागरीकरणामुळे शहरात वास्तव्य व विविध क्षेत्रातील कामाच्या संधीमुळे नागरिक शहरास प्राधान्य देत आहेत. यामुळे पुनावळेसारख्या वाढत्या नागरीकरण असलेल्या भागामध्ये सुसज्ज रस्ते असणे गरजेचे असून त्यामुळे येथील होणाऱ्या वाहतूक कोंडीतून नागरिकांची मुक्तता होणार आहे. प्रभाग २५ पुनावळे, ताथवडे, वाकड भागातील विविध भागांना जोडणाऱ्या रस्त्यांच्या विकास कामांना महापालिकेने मंजुरी दिली आहे. शहरामधील दळणवळणाची स्थिती सुधारणे महापालिकेचे ध्येय असून त्यावर महापालिकेकडून पावले उचलण्यात आली आहेत.
>
> - शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, महानगरपालिका.

# दांडियात महिलांची छेडछाड काढल्यास 'दंडुका'

## नवरात्रोत्सवाच्या काळात पोलीस पायी गस्त घालणार : पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे

**पिंपरी | प्रतिनिधी**

नवरात्रोत्सवात दांडिया आणि गरबा खेळण्याच्या ठिकाणी महिलांच्या छेडछाडीचे प्रकार घडल्यास कडक कारवाई करण्याचा इशारा पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी दिला आहे. नवरात्रोत्सवाच्या काळात गर्दीच्या ठिकाणी कोणताही गैरप्रकार होऊ नये, यासाठी पोलीस ठाणे, गुन्हे शाखेतील अधिकारी आणि कर्मचारी यांनी पायी गस्त घालण्याचे आदेशही पोलीस आयुक्तांनी दिले आहेत.

नवरात्रोत्सव उत्सवाच्या पार्श्वभूमीवर पोलीस आयुक्त चौबे यांनी तिन्ही परिमंडळ कार्यालयांमध्ये भेट देऊन आढावा घेतला. आयुक्तालयाअंतर्गत येणाऱ्या १८ पोलीस ठाण्यातील प्रभारी अधिकाऱ्यांनाही त्यांनी सूचना दिल्या. यावेळी पोलीस उपायुक्त संदीप डोईफोडे, विशाल गायकवाड, स्वप्ना गोरे, डॉ. शिवाजी पवार, सहायक पोलीस आयुक्त सचिन हिरे, मुगुटलाल पाटील, राजेंद्रसिंह गौर यावेळी उपस्थित होते.



नवरात्र उत्सवामध्ये दांडिया खेळण्याच्या ठिकाणी आणि आजूबाजूच्या परिसरात आवश्यक तो बंदोबस्त लावण्यात यावा. हद्दीतील उद्याने, मोकळी मैदाने, सार्वजनिक गर्दीची ठिकाणे या जागी गस्त घालावी. गर्दीच्या ठिकाणी मोकाट जनावरे फिरणार नाहीत, याची दक्षता घ्यावी, अशाही सूचना पोलीस आयुक्त चौबे यांनी दिल्या.

नवरात्रौत्सवाच्या काळात अनेक ठिकाणी गर्दी होत असते. गर्दीच्या ठिकाणी कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी दक्षता घेण्याचेही आदेश पोलीस आयुक्तांनी दिले आहेत. त्यानुसार दररोज गर्दीच्या ठिकाणी पोलीस ठाणे तसेच गुन्हे शाखेतील अधिकारी आणि कर्मचारी यांनी पायी गस्त घालावी, अशा सूचना दिल्या आहेत.

### नवरात्र मंडळांना सूचना

**» नवरात्री मंडळांनाही सुरक्षिततेसाठी उपाययोजना करण्याच्या सूचना पोलीस आयुक्तांनी दिल्या आहेत. त्यानुसार 'सीसीटीव्ही' कॅमेरे लावावेत, देवीची मूर्ती असलेले ठिकाण आणि दांडिया खेळण्याच्या ठिकाणी मंडळांनी स्वयंसेवक नेमावेत, असे सुचविण्यात आले आहेत. उत्सव शांततेत होण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करण्याचे आवाहनही पोलीस आयुक्त चौबे यांनी केले आहे.**

# हर्षवर्धन पाटलांचा भाजपाला रामराम

## जी भूमिका घेतो, ती जनतेची भूमिका असते. त्यामुळे आम्ही आज पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांसह राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार यांच्या पक्षात प्रवेश करण्याचा निर्णय घेतला आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

गेली ६ दशकापासून पवार कुटुंबाचे आणि आमचे संबंध खूप चांगले आहेत. परंतु आज निर्णय करताना आम्ही जी भूमिका घेतो, ती जनतेची भूमिका असते. त्यामुळे आम्ही आज पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांसह राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार यांच्या पक्षात प्रवेश करण्याचा निर्णय घेतला आहे. भाजपाच्या राज्यातील प्रमुख नेत्यांशीही चर्चा झाली त्यांना माझ्या निर्णयाची कल्पना दिली. शरद पवारांच्या चर्चेनंतर मी त्यांच्या पक्षात जाण्याचा निर्णय घेतोय असं सांगत हर्षवर्धन पाटील यांनी भाजपाला रामराम ठोकला आहे.



हर्षवर्धन पाटील यांनी इंदापूरात समर्थकांचा जाहीर मेळावा घेतला. त्यानंतरच्या पत्रकार परिषदेत ते म्हणाले की, गेली २ महिने मी तालुक्यातील गावागावांचा दौरा करतोय. नेमका निर्णय काय घ्यायचा यासाठी मी राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची भेट घेतली. दीड दोन तास राजकीय भूमिकेबद्दल चर्चा झाली. त्यांनी माझ्यासमोर काही प्रस्ताव ठेवले, मी माझी भूमिका मांडली. शेवटी निवडणूक लढवायची असेल तर ही जागा महायुतीतील विद्यमान सदस्य असतील ते लढवणार असं त्यांनी सांगितला. दुसरा पर्याय दिला तो व्यक्तिश: मला आणि माझ्या कार्यकर्त्यांना स्वीकारणे योग्य वाटला नाही. राजकारणात आणि समाजकारणात व्यक्तिगत प्रश्नापेक्षा आपल्यामागील जनतेचं हित महत्त्वाचं असते. मी गुरुवारी सिल्व्हर ओकला शरद पवारांना भेटायला गेलो. तिथे दीड तास सविस्तर चर्चा झाली. त्या बैठकीत खासदार सुप्रिया सुळे उपस्थित होत्या. फोनवरून जयंत पाटीलही होते. तुम्ही आमच्या पक्षात यावं असा आग्रह पवारांनी धरला अशी माहिती त्यांनी दिली.

त्यानंतर कार्यकर्त्यांचा आग्रह राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवारांचा पक्ष यात जावं होता. त्यामुळे मी आणि आमचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवारांचा पक्ष यात जाण्याचा निर्णय जाहीर केला. हा माझ्या एकट्याचा निर्णय नाही. मी भाजपाचे जे प्रमुख नेते आहेत, त्यांच्यासोबत ५ वर्ष काम केले. त्यात रावसाहेब दानवे, राधाकृष्ण विखे पाटील तसेच इतर सहकाऱ्यांशीही चर्चा केली. त्या सगळ्यांनाही माझ्या निर्णयाची कल्पना दिली आहे. इंदापूर तालुक्यात लोकांची भूमिका महत्त्वाची आहे. गेली १० वर्ष या तालुक्यात जी माणसं आमच्यामागे ठामपणे उभी राहिली त्यांच्यावर खूप अन्याय झाला. त्यामुळे हा जनतेचा उद्रेक याठिकाणी निर्माण झाला आहे असा आरोप हर्षवर्धन पाटील यांनी केला.

### राजकीय वनवास संपुष्टात येणार

» गेल्या महिना-दोन महिने सर्वांनी भावना व्यक्त केल्या, मी पदाला हापापलेला माणूस नाही. राजकारणात पुढे काय घडणार याची चिंता करण्याची गरज नाही. इंदापूर तालुक्याचा राजकीय वनवास संपुष्टात आल्याशिवाय राहणार नाही. नव्या पर्वाची सुरुवात करणार आहोत. जो काही निर्णय जाहीर करायचा असतो, त्यांच्या पक्षात प्रवेश करताना तारीख आणि पुढची भूमिका काय असणार हे ते ठरवतील. आपल्या सगळ्या मनाप्रमाणे भूमिका स्पष्ट करतो. उद्या काहीही झाले तर दोन वेळच्या निवडणुकीचा अनुभव लक्षात घेता तिसऱ्यांदा लढाईची वेळ आल्यानंतर कुठेही कमी पडता कामा नये एवढी खबरदारी घेण्याची आवश्यकता आहे. पाटील कुटुंब आपलं आहे. इंदापूर तालुका एकच कुटुंब आहे असं समजून वाटचाल करूया असं आवाहन हर्षवर्धन पाटील यांनी कार्यकर्त्यांना केले.

दरम्यान, राजकारणात कोण कोणाचं शत्रू नसतो. प्रत्येकाचे व्यक्तिगत संबंध असतात. आज मी हा निर्णय घेतला म्हणून इतरांशी संबंध दुरावले असं होत नाही. महाराष्ट्राची ही संस्कृती आहे. संस्कृती जपण्याचे काम करतोय. भाजपा तालुकाध्यक्ष, युवा मोर्चा अध्यक्ष, माझ्यासहित भाजपाच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे. आम्ही सर्वजण राष्ट्रवादी शरद पवार पक्षात प्रवेश करतो. आपल्याला कुणाबद्दल वाईट बोलायचं नाही, आपल्याला भविष्यातील विजय मिळवायचा आहे. सगळ्या गोष्टी संयमाने घ्या, आपण ६० वर्ष विजयही बघितला आहे, १० वर्षाचा पराजयही बघितला आहे. पवार कुटुंबाचे आणि आपले व्यक्तिगत संबंध आहेत. गेल्या ६ दशकापासून संबंध आहे. राजकारणात वेगळे निर्णय झाले असतील परंतु व्यक्तिगत संबंधात कधीही टोकाची भूमिका घेतली नाही. कुणालाही काही बोलू नका, जे व्हायचं ते व्यवस्थित होईल. मागील १० वर्षात जो त्रास झाला आहे तो दुरुस्त करायचा असेल तर इथला प्रत्येकजण उद्याच्या परिवर्तनाचा महत्त्वाचा घटक आहे असं हर्षवर्धन पाटील यांनी म्हटलं.

# पुण्यावर आता 'एआय' कॅमेऱ्यांची नजर

## शहरातील गर्दीची ठिकाणे, रेल्वे स्थानक, एसटी स्थानकात हे कॅमेरे बसविण्यात येणार

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील वाढते गंभीर गुन्हे, सराइतांच्या हालचाली टिपण्यासाठी पुणे पोलिसांकडून कृत्रिम बुद्धीमत्तेवर आधारित (आर्टीफिशयल इंटेलिजन्स) सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येणार आहे. पहिल्यांदाच अशा प्रकारच्या तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येणार आहे. 'एआय' तंत्रज्ञानावर आधारित दोन हजार ८८६ कॅमेरे बसविण्यासाठी राज्य शासनाने ४३३ कोटी रुपयांचा निधीही मंजूर केला आहे. या कॅमेऱ्यांच्या माध्यमातून सराइतांवर करडी नजर ठेवली जाणार आहे. या कॅमेऱ्यांमुळे गुन्हेगारांना चाप बसणार आहे.




एआय तंत्रज्ञानावर आधारित अशा प्रकारचे कॅमेरे पहिल्यांदाच बसविण्यात येणार आहे. या कॅमेऱ्यांच्या माध्यमातून गुन्हेगारांच्या हालचालीवर लक्ष ठेवणे शक्य होणार आहे. फेस रेकग्निझेशन तंत्रज्ञानामुळे गुन्हेगाराची माहिती त्वरित पोलिसांना म्हणजे पोलीस नियंत्रण कक्षाला (कंट्रोल रुम) मिळणार आहे. हे कॅमेरे बसविण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे.

'एआय' तंत्रज्ञानावर आधारित नवीन दोन हजार ८८६ कॅमेरे बसविण्यात येणार आहे. यापूर्वी शहर, तसेच उपनगरांत १३०० कॅमेरे बसविण्यात आले आहेत. नवीन तंत्रज्ञानावर आधारित कॅमेरे बसविण्यात आल्यास शहराची सुरक्षा अधिक सक्षम होणार आहे, तसेच सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या जाळ्याचा विस्तार वाढणार आहे.

### देशातील गुन्हेगारांवर नजर

» यपूर्वी शहरात बसविण्यात आलेले १३०० कॅमेरे 'एआय' तंत्रज्ञानानुसार अद्ययावत केले जाणार आहेत. या कॅमेऱ्यांच्या माध्यमातून पुण्यातील नव्हे, तर देशभरातील गुन्हेगारांवर नजर ठेवण्यात येणार आहे. फेस रेकग्निझेशन तंत्रज्ञानावर आधारित असलेले हे कॅमेरे पुण्यातील नव्हे, तर देशभरातील गुन्हेगारांवर नजर ठेवतील. फरार आरोपी पुण्यातील कॅमेऱ्यांद्वारे टिपला गेल्यास त्याची माहिती त्वरित पोलिसांना मिळेल. शहरातील गर्दीची ठिकाणे, रेल्वे स्थानक, एसटी स्थानकात हे कॅमेरे बसविण्यात येणार आहेत. फरार आरोपीला हे कॅमेरे टिपतील. गुन्हेगाराने वेशभूषा बदलली तरी त्याला टिपता येणे शक्य होईल.